# जिल्हा परिषद अमरावती

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१

दूरध्वनी क्रमांक - २६६२९२६ ई मेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in

वेबसाईट - www.zpamravati.gov.in


दि.११ मे,2017 रोजी होणा-या जि.प.सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने जि.प.खातेप्रमुखांची पूर्व तयारी सभा तसेच अनुपालनाचे अनुषंगाने केलेली कार्यवाही आणि सूचना पुढीलप्रमाणे-

| अक्र | मुद्दा | विभाग |
|---|---|---|
| १. | दिनांक ११ मे २०१७ रोजी वेळेवरच्या विषयांबाबत ठेवण्यात येत असल्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>1. ) बांधकाम विभागाकडुन मुख्यालय,विश्रामगृह तसेच आवारातील स्वच्छता आणि सुरक्षेसाठी रु.४८.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.सदरचा विषय समितीचे सभापती यांची संमती घेवून सभेसमोर सादर करावा.<br>2. ) इतर विभागांचे वेळेवरील विषय नाहीत. | बांधकाम विभाग |
| २. | सभेसमोर वेळेवरचा विषय सादर करतांना विषयांची अपवादात्मक परिस्थिती नमुद करुनच विषय ठेवावे.वेळेवरच्या विषयांत कमीत कमी विषय ठेवावेत. | सर्व विभाग |
| ३. | माहे नोव्हे.२०१६ आणि डिसेंबर २०१६ मध्ये झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय नाकारले गेल्यास तसे संबंधित विभागास कळविण्यात यावे,जसे पथ्रोट,घाटलाडकी येथील मंजुरीबाबतचे विषय ई. | परिषद |
| ४. | माहे नोव्हेंबर २०१६ आणि डिसेंबर २०१६ मध्ये अनुपालनास्तव असलेल्या मुद्दयांचे अनुपालन मुद्देनिहाय सादर करावे. | परिषद |
| ५. | तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाईचे अनुषंगाने सभेने निर्देश दिलेले होते.त्या अनुषंगाने का.अ.बांधकाम यांची प्राथमिक अहवाल सादर करावा. | बांधकाम |
| ६. | सभेपूर्वी मुकाअ यांनी सर्व संबंधित विभागाच्या खाते प्रमुखांचा आढावा घ्यावा,असे निर्देश देण्यात आलेले होते.त्यानुसार मुकाअ यांनी दि. ९ मे,2017 रोजी बैठक घेतल्याचे अनुपालन सादर करावे. | परिषद |
| ७. | मंगरुळ चव्हाळा ता.नांदगांव खंडेश्वर येथील पशु वैद्दकीय अधिकारी यांचे चौकशी बाबत अहवाल सादर करावा. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी |
| ८. | धडक सिंचन कार्यक्रमांची प्रगती तसेच आजची स्थिती याबाबतची टिप्पणी सादर करावी व तसे अनुपालन करावे. | उपमुकाअ नरेगा |
| ९. | जि.प.मुद्रणालय सुरु करण्यासाठी समिती स्थापन करुन निर्णय देण्याबाबत निर्देश होते.त्यानुसार समितीने केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन करण्यात यावे. | परिषद |
| १०. | मा.श्री.महेंद्र गहेलवार यांनी मागणी केल्याप्रमाणे काम बदल बाबतचा अहवाल यांनी चौकशी अहवाल यांनी त्यानुसार केलेल्या कार्यवाहीच्या माहितीचे अनुपालन करावे. | परिषद |

| | | |
|---|---|---|
| 11 | प्रत्येक ठरावाचे अनुपालन पुढील बैठकीपूर्वी लेखी सादर करावे. तसचे बैठकीतील चर्चेमधिल सूचनांचे अनुपालन करावे. बैठकीचे कार्यवृत्त प्राप्त होण्यास विलंब होत असल्यास बैठक सुरु असताना चर्चेतील मुद्ये संबंधित विषयाच्या खाते प्रमुखांनी लिहून घ्यावेत आणि विहित वेळेत अनुपालन सादर करण्याची पध्दती यापुढे सुरु करण्यात येत आहे. त्यानुसार सर्व कार्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी. | सर्व विभाग |
| 12 | तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता (श्री. साकुरे) यांचेवर सभागृहाने केलेल्या सूचनांप्रमाणे कारवाई करण्याचे निर्देशीत केले होते. त्यासंदर्भातील प्राथमिक चौकशी अहवाल सभागृहासमोर सादर करावा. | अतिरिक्त मु.का.अ. |
| 13 | नियम 44 बाबत विभागाचे स्पष्टीकरण/अहवाल लेखी स्वरुपात सादर करावा. | कार्यकारी अभियंता बांधकाम |
| 14 | वित्त समिती - लेखा विषयक कामांबाबतचे मत सादर करावे. | मु.ले.वि.अ. |
| 15 | पापळ ते वाढोना रस्ताबाबतचा चौकशी अहवाल सादर करावा. | अतिरिक्त मु.का.अ. |
| 16 | पापळ - नादगांव खंडेश्वर, कोहळा जटेश्वर सभागृह दुरुस्ती आणि महादेव मंदीर काजना येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे इ. बाबतच्या चौकशीसाठी श्री. राहूल कार्डीले, परिविक्षाधीन भाप्रसे,यांचे समितीने चौकशी केलेली आहे. त्यानुसार अहवाल सादर करावा. | अतिरिक्त मु.का.अ. |

उपरोक्त मुद्यांचे अनुपालन दिनांक 10.5.2017 रोजी दूपार पर्यत सादर करावे. सदरचे कार्यवृत्त जि.प. संकेतस्थळ www.zpamravati.gov.in (मु.का.अ. कार्यालय परिपत्रके)वर उपलब्ध आहे.

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

प्रत-

सर्व कार्यालय प्रमुख, जिल्हा परिषद अमरावती यांना कार्यवाहीस्तव अग्रेषित.